## सरकार तर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | निलेश धोंडूजी पाल, |
| वय | - | ३७ वर्षे, |
| व्यवसाय | - | शेती, |
| राहणाार | - | भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर. |

**सरतपासणी–सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत –**

१. दि. १६.०५.२०२३ रोजी पोलीसांना मला समन्स दिला नव्हता. पोलीसांनी माझ्यासमोर कार्यवाही केल्याचे मला आठवत नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीत नाही. सहीला **नि.क्र.८** देण्यात येते. मी आरोपीला ओळखत नाही.

**सरतपास संपला.**

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.**

**उलट तपास - सरकार तर्फे**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. १६.०५.२०२३ रोजी पोलीसांनी मला मरु नदीच्याजवळ पंचनाम्याकरिता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष अपघात झालेल्या ठिकाणाचा घटनास्थळ पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला तो पंचनामा मला वाचून दाखविला

व माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री. नागोसे यांचे मार्फत –**

३. नाकारला.

**उलट तपास संपला.**

**फेरतपास काहीही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक १७.०२.२०२५

स्वा/-
(एस.जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.